**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७/१९</u>**

**अनुसया उर्फ सुलेखा विरूध्द शासन व इतर**

**<u>आदेश नि.क्र. ५ खाली</u>**

सदरचा अर्ज तात्पुरत्या मनाई हुकूमासाठी सादर केलेला आहे.

२. अर्जदाराने कथन केले की, अर्जदार या पहिली पत्नी म्हणुन घोषीत करुन कौटूंबिक निवृत्ती वेतन मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. अर्जदार या मयत मोहनराव जयवंतराव जगताप यांच्या कायदेशीर पहिल्या पत्नी आहेत. मयत मयत मोहनराव जयवंतराव जगताप हे शिवाजी महाविद्यालय, उदगीर येथुन सेवानिवृत्त झालेले आहेत. प्रतिवादी क्रं. ५ या मयत मोहनराव जयवंतराव जगताप यांची बेकायदेशीर दुसरी पत्नी आहेत व प्रतिवादी क्रं. ५ यांना प्रतिवादी क्रं. २ ते ४ यांनी बेकायदेशीरपणे मयत मोहनराव जयवंतराव जगताप यांची पत्नी/विधवा म्हणुन कौटूंबिक निवृत्ती वेतन चालू केले आहे जी की, बेकायदेशीर आहे. तसेच, प्रतिवादी क्रं. ५ यांना चालू असलेले निवृत्ती वेतन त्वरीत थांबवले गेले नाही तर वादीचे अतोनात नुकसान होईल जे की, कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे एकतर प्रतिवादी क्रं. ५ यांना चालु असलेले निवृत्ती वेतन त्वरीत थांबवावे किंवा प्रतिवादी क्रं. २ ते ५ यांनी सदरील रक्कम मा. न्यायालयात जमा करावी.

३. मुळ प्रकरणाचे अवलोकन केले. अर्जदार व त्यांच्या वकिलांचे म्हणणे ऐकले. प्रकरणाचे स्वरुप पहाता तसेच, इतर प्रतिवादी हे शासनाचे प्रतिनिधी आहेत. अशा प्ररिस्थितीमध्ये गैरअर्जदारांना नोटीस न देता अथवा त्यांचे म्हणणे न ऐकता एक तरफा निवृत्ती वेतन देणे थांबविण्याचा किंवा मिळालेली सदरील रक्कम हि न्यायालयात जमा करण्याचा हुकूम मंजुर करणे योग्य होणार नाही. करिता, गैरअर्जदाराचे म्हणणे ऐकणे गरजेचे आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्रं. २ ते ४ यांनी प्रतिवादी क्रं. ५ यांना निवृत्ती वेतन देण्याचे का थांबविण्यात येऊ नये ? किंवा आत्तापर्यंत मिळालेली निवृत्ती वेतन न्यायालयात जमा का करण्यात येऊ नये अशी नोटीस काढणे योग्य होईल.

**<u>आदेश</u>**

१. वादींनी मागितलेला प्रतिवादी क्रं. ५ यांना निवृत्ती वेतन देण्याचे का थांबविण्यात येऊ नये ? किंवा आत्तापर्यंत मिळालेली निवृत्ती वेतन न्यायालयात जमा का करण्यात येऊ नये अशी कारणे दाखवा नोटीस प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना काढण्यात यावी.

२. प्रकरणाची तातडी पाहता नोटीस परतीची तारीख ०७/०३/२०१९ नेमण्यात येते.

दिनांकः०७/०२/२०१९.

(जयदेव य.घुले)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.